Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education, Pune
S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near e-Balbharti, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे
स.न.८३२-ए. फा.प्लॉ.नं.१७८,१७९, ई बालभारती शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४



Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 & EPABX -25705000 Fax : 25665807 &
Email : secretary.stateboard@gmail.com

महत्वाचे/प्राधान्ये

क्र.रा.मं. /परीक्षा -३/ ३८५४
पुणे -४११००४
दिनांक- ०१/०९/२०२६

प्रति,

विभागीय सचिव,
सर्व विभागीय मंडळे.

विषय- माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा फेब्रुवारी – मार्च- २०२७ परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्याच्या सूचनाबाबत .

संदर्भ – या कार्यालयाचे पत्र क्र.रा.मं /परीक्षा -३ /३२३४ दिनांक -३१/०७/२०२६ रोजीचे पत्र

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की,माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी ) परीक्षा फेब्रु – मार्च- २०२७ परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थी नावनोंदणी अर्ज त्याच्या यापूर्वी शिकलेल्या शाळेतून/ कनिष्ठ महाविद्यालयामधून भरणे अनिवार्य असल्याचे संदर्भिय पत्रानुसार कळविण्यात आले होते .

तथापि याबाबत सूचित करण्यात येते की, अपवादात्मक परिस्थितीत ज्या विद्यार्थ्यांना मागील शाळा /कनिष्ठ महाविद्यालयामधून खाजगी विद्यार्थी नावनोंदणी करणे शक्य नसेल त्या विद्यार्थ्यांनी त्यांचा सध्याचा रहिवासी पत्ता (Current Address) नमूद करावा व त्याबाबतचा आवश्यक तो पुरावा अपलोड करावा. त्यानुसार विद्यार्थ्यांना त्यांच्या सध्याच्या पत्यातील (Current Address) जिल्हा, तालुका व त्याने निवडलेल्या माध्यमानुसार, त्यास माध्यमिक शाळा /कनिष्ठ महाविद्यालय यांची यादी दिसेल, त्यामधील एका माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांची निवड विद्यार्थ्याने करावयाची आहे.

ज्या विद्यार्थ्यांना नावनोंदणी करताना दूरच्या शाळा /कनिष्ठ महाविद्यालयामध्ये नावनोंदणी करावी लागत आहे अशा विद्यार्थ्यांच्या बाबत विभागीय मंडळांनी रहिवासी पत्ता व निवडलेली शाळा /कनिष्ठ महाविद्यालय यांची पडताळणी व खात्री करावी.

तरी याबाबत विभागीय मंडळांनी आपल्या कार्यकक्षेतील सर्व माध्यमिक शाळा /कनिष्ठ महाविद्यालय यांना आपल्या स्तरावरुन सूचित करावे. कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही यांची दक्षता घ्यावी .

(डॉ.दिपक माळी)
सचिव,
राज्य मंडळ पुणे-०४

क्र.कोविमं/१२ वी/परीक्षा/ 3095
दिनांक :- ०३/०९/२०२६

प्रति,

प्राचार्य/मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये/शाळा,
जिल्हा- सातारा,सांगली,कोल्हापूर.

विषय:-माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) फेब्रु-मार्च २०२७ परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्याच्या सूचनाबाबत.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने मंडळामार्फत फेब्रु-मार्च 2027 मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12वी) परीक्षेस खाजगीरित्या (अर्ज क्र. 17अन्वये) प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या नावनोंदणी प्रक्रियेच्या अनुषंगाने Address Of Last School Attended X OR XI / Current Address in case of Exception बाबत वरील पत्राप्रमाणे उचित कार्यवाही करावी.

3.9.2026
(गजानन उकिर्डे)
विभागीय सहा.सचिव
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर